Maharashtra Times
Dec 98

# संवादिनी व सतार यांची अनोखी जुगलबंदी

पुण्याच्या एस. पी. महाविद्यालयांत नऊ डिसेंबरला 'स्पीकमॅकें' या संस्थेने एक आगळा वेगळा कार्यक्रम आयोजित केला होता. भारतात प्रथमच संवादिनी व सतार या वाद्यांचा जुगलबंदीचा कार्यक्रम झाला असेल. या दोन्ही वाद्यांच्या रचनेत व त्यातून निर्माण होणाऱ्या आविष्कारामध्ये स्वभावतःच भिन्नता आहे. संवादिनी हे सुषीर वाद्य तर सतार हे तंतुवाद्य असल्याने या कार्यक्रमाबद्दल खूपच औत्सुक्य होते. पण दोन सिध्दहस्त कलाकार एकमेकांची शैली ओळखून, आपल्या वाद्याचा डौल न बिघडवता व दुसऱ्याला सांभाळून घेत, एकमेकांना पूरक होईल अशा तऱ्हेने एखादी मैफल कशी जिंकतात, याचे त्यादिवशी प्रात्यक्षिक ऐकायला मिळाले.

उस्ताद शहीद परवेझ (सतार) व पं. मनोहर चिमोटे (संवादिनी) या दोन मातब्बर कलाकारांची शैली मुळातच स्वतंत्र बाण्याची ओढ. त्यातून पं. चिमोटे यांनी अत्यंत विचारपूर्वक ज्याला स्वयंभू गंधार म्हणतात, त्याचा पाया धरुन काळी दोनमध्ये त्यांच्या वाद्यांची स्वरस्थापना केलेली आहे. शहीद परवेझ यांच्या वाद्याची रचना काळी एक असल्याने आधी या दोन्ही वाद्यांचा सांगीतिक मिलाफ ही कठीण बाब होती. परंतु काळी एकमध्ये नवीन संवादिनी बनवून एक तासाच्या तालमीनंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.

कार्यक्रमाची सुरुवात मधुवंती या सायंकालीन रागाने झाली. मधुवंती हा मुळातच रसीला राग असल्याने व दोन्ही कलाकार सिध्दहस्त असल्याने कार्यक्रम रंगला. वाद्यसंगीताच्या परंपरेला अनुसरुन आलाप जोड झाला व त्यानंतर विलंबित तीन तालामधील गत तसेच मध्यलयीत वाजवलेली गत व सरतेशेवटी द्रुत लयीत वाजविलेली गत आणि झाला अशा रीतीने रागांची बढत करत एकमेकांच्या वाद्यातील अलंकारास पूरक अशा रीतीने वाजवून सुमारे दीडतास कलाकारांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. कलावंताना तितक्याच तडफेने अतिशय समर्पक व पूरक अशा सर्वांगाने साथसंगत तरुण तबलावादक विजय घाटे यांनी केली.

— भानू जोशी